# दिवंगत अरुण जेटली यांच्या निधनावर महापौर नंदा जिचकार यांची प्रतिक्रिया

## अभ्यासू, संयमी नेता गमावला

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या निधनाने संपूर्ण देशालाचा मोठा झटका बसला आहे. दिवंगत अरुण जेटली हे पक्षनेत्यांसाठी आणि आम्हा कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक होते. त्यांच्या अर्थमंत्रीपदाच्या कार्यकाळातच नोटाबंदी, वस्तू व सेवा कर (जीएसटी)सारखे मोठे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांच्या अंमलबजावणीतही अरुण जेटली यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या जाण्याने देश एका अभ्यासू, संयमी नेता व उत्कृष्ट संसदपटूला मुकला. त्यांच्या आत्म्यास चीरशांती मिळो, हीच ईशचरणी प्रार्थना.